# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-१२० दिनांक - २६/०३/२०२४

## ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम रुपये ३५,५६४/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड परिसरातील श्री. सुनीत XXXX एसबीआय बँ मधून बोलत असल्याचे भासवून त्यांच्या एसबीआय कार्डवरती इंटरनॅशनल ट्रान्झेक्शन अॅक्टीवेट झाल्याचे सांगुन ते बंद करण्यासाठी ओटीपी पाठवला असता त रारदार यांनी ओटीपी शेअर ल्यामुळे त्यांच्या बँक खात्यातुन ३५,५६४/- ची रुपयांची फसवणूक झाल्याबाबतची तक्रार सायबर पोलीस ठाणे येथे प्राप्त होती.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक – ७६९-बी/२०२४ दि.१९/०३/२०२४)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. तसेच सदर NCCRP PORTAL पोर्टलवरती तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. तक्रारदार यांची रक्कम HOUSING.COM या रियल एस्टेट पार्टलवर गेल्याचे दिसून आल्याने त्यांची फसवणुक झालेली रक्कम थांबविण्यात आली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने HOUSING.COM यांचेसोबत सातत्यपुर्ण पाठपुरावा करून नमूद फसवणूक झालेली रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **बँक/क्रेडीट कार्ड पनी कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिति विचारणा करत नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तिक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, अॅप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोअं/२३०५७ विलास खाटीक, मपोअं/२३६३९ स्नेहन पुणे, पोअं/२३३२१ राहुल बन, पोअं/२३८०७ ओंकार डोंगरे, पोअं./२२०४० प्रशांत बोरकर मसुब/प्रविण सांवत व मसुब/सोनाली मोरे यांनी पार पाडली आहे.

- सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----